नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १६७ Issue - 167 | वार - शनिवार दि. १४ नोव्हेंबर २०२६ Blow- Saturday Date 14 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

तिसऱ्या चक्रीवादळाची चाहूल, अनेक राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यात दुष्काळाची स्थिती मात्र ओडिशा राज्यात येलो अलर्ट. आग्नेय बंगालच्या उपसागरात १६ तारखेला चक्रीवादळ येण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज . ओडिशा राज्यात सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन यंत्रणा अलर्ट ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सगळे मंत्री या स्थितीचा आढावा घेणार आहेत . हा जरी अंदाज किवा शक्यता असली तरी प्रशासन अलर्ट मोडवर आहे .१८ आणि १९ तारखेला केंद्रपाडा आणि जगतसिंगपूर या ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे .



६५ किमी वेगाने समुद्रात वारे वाहणार

राज्यात सध्या दुष्काळी स्थिती आहे. अल निनोचा परिणाम पाहायला मिळाला. एकीकडे राज्यात दुष्काळाची स्थिती असताना दुसरीकडे मात्र भारतीय हवामान विभागाने चक्रीवादळ येण्याची शक्यता वर्तवली आहे. आग्नेय बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. कमी दाबाच क्षेत्र हे हळूहळू तीव्र होत जाईल. याचा परिणाम म्हणून चक्रीवादळात याच रूपांतर होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. भारतीय हवामान विभागाने जी शक्यता वर्तवली आहे त्यानुसार हे चक्री वादळ तयार होण्याच कारण कमी दाबाचा पट्टा आहे. मध्य अंदमान समुद्र आणि निकोबार बेटाच्या वरती असलेल्या चक्राकार स्थितीचा हा परिणाम आहे. पहाटेच्या दरम्यान हे कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल होत.

जे कमी दाबाचा क्षेत्र तयार झाल आहे. ते हळूहळू वायव्य दिशेने सरकत पुढे जाईल. १५ नोव्हेंबर पर्यंत हे खोल कमी दाबाच्या क्षेत्र या बाजूने तयार होईल अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. १३ आणि १४ तारखेला अंदमान समुद्रात आणि १३ ते १६ तारखेच्या दरम्यान वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता आहे. या मध्ये वाऱ्याचा ताशी वेग ५० किमी, तर वाऱ्याचा झोत हा ६० किमी पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. १५ ते १७ नोव्हेंबरला नैऋत्य उपसागर आणि १६ व १७ तारखेला मध्य बंगालच्या उपसागरात जोराचा वारा सुटेल आणि वाऱ्याचा झोत हा ६५ किमी पर्यंत वाढू शकतो.

याचा परिणाम हा ओडिशा राज्यात होण्याची शकतात आहे. ओडिशा सरकारकडून सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांना अलर्ट दिला गेला आहे. ओडिशा सरकारने बाजूची किनारपट्टी, दक्षिण भागातील जिल्हाधिकारी, सगळे प्रशासन यांना अलर्ट दिला आहे. आपत्कालीन स्थिती उद्भवली तर त्या स्थितीमध्ये प्रशासन अलर्ट असाव यासाठी निर्देश देण्यात आले आहेत.

चक्रीवादळ येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे त्या बद्दल अनिश्चितता असली तरी ही प्रशासनाने खबरदारी घेतली आहे. आम्ही सरकार म्हणून पूर्ण खबरदारी घेतली आहे. उत्तर दक्षिण आणि किनारपट्टी भागातील जिल्हाधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या आहेत. समुद्रात ज्या हालचाली होत आहेत. त्या वर प्रशासनाची नजर आहे आणि सतर्कता बाळगत आहोत अशी माहिती मंत्र्यांनी दिली आहे. हवामान विभागाने भुवनेश्वरमध्ये १८ आणि १९ तारखेला केंद्रपाडा आणि जगतसिंगपूर या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडेल. येलो अलर्ट प्रशासनाने जारी केला आहे.

भरधाव ट्रॅव्हलर थेट ट्रकला धडकला; अपघातात २४ जणांचा जागीच मृत्यु

आसामच्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यानच्या जवळ भीषण अपघात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गुवाहाटी: आसामच्या काझीरंगा राष्ट्रीय उद्यानच्या जवळ झालेल्या भीषण रस्ते अपघाताचा व्हिडीओ समोर आला आहे. या २ सेकंदांच्या व्हिडीओमध्ये एक पांढऱ्या रंगाचा टेम्पो ट्रॅव्हलर भरधाव वेगात येताना दिसतो. त्याच्या समोर एक ट्रक उभा आहे. पुढच्या क्षणाला ट्रॅव्हलर थेट ट्रकला धडक देतो. धडक इतकी जोरदार असते की व्हिडीओत अचानक तीव्र प्रकाश आणि स्फोटासारखं दृश्य दिसतं.



गोलाघाट जिल्ह्यातील रंगाजन परिसरात शुक्रवारी झालेल्या अपघातात २४ जणांचा मृत्यू झाला. तर २० जण जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथकं दुर्घटनास्थळी पोहोचली. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या अपघाताबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अनेक नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये पांढऱ्या रंगाचा ट्रॅव्हलर भरधाव वेगात रस्त्यावर सुसाट पळताना दिसतो. त्यानंतर समोर एक कंटेनर ट्रक दिसतो. काही क्षणांत ट्रॅव्हलर ट्रकला धडक देतो. हा संपूर्ण अपघात जवळपास २ सेकंदाच्या व्हिडीओमध्ये कैद झाली. व्हिडीओमध्ये अपघातानंतर तीव्र प्रकाश दिसतो. त्यातून अपघाताची तीव्रता लक्षात येते. निमिषार्धात ही संपूर्ण घटना घडली आणि होत्याचं नव्हतं झालं. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातात मरण पावलेल्यांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. अनेक मृत पावलेले प्रवासी महाविद्यालयीन विद्यार्थी आहेत. ते महाविद्यालयातून घरी परतत होते. ट्रॅव्हलरमधील बहुतांश प्रवासी तरुण होते. या अपघातात २० जण जखमी झाले आहेत. पोलीस आणि बचाव पथकांनी घटनास्थळी पोहोचून मदत आणि बचाव कार्य सुरू केलं. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

प्रशासनानं अपघाताचा तपास सुरू केला आहे. भरधाव वेगामुळे अपघात झाल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. अपघाताचं नेमकं कारण तपासातून स्पष्ट होईल. स्थानिक नागरिक आणि पर्यटकांच्या प्रवासामुळे काझीरंगाजवळील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते. या अपघातामुळे सुरक्षित प्रवासाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

दिल्लीत सुप्रिया सुळे-प्रफुल पटेलांची बैठक; राष्ट्रवादीतील विलीनीकरणाच्या चर्चेला गती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : राज्याच्या राजकारणात दिवाळीनंतर मोठा भूकंप पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तवली जात आहे. कारण, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू असून आता राष्ट्रवादीचे नेतेही या चर्चेवर सकारात्मक प्रतिक्रिया देताना दिसून येतात. मात्र, माझा भाऊ गेला, आमच्याकडून विलीनकरणाच्या चर्चेला पूर्णविराम मिळालाय, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले होते. त्यानंतर, आज राजधानी दिल्लीत दोन्ही राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांची दिल्लीत बैठक झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

राज्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या हालचाली गतीमान असल्याचं दिसून येत आहे. कारण, आधी छगन भुजबळ यांनीही अजित पवारांच्या हयातीतच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली होती, जयंत पाटील आणि अजित पवारांची भेट झाल्यानंतर हा विषय चर्चेत होता,



असे भुजबळ यांनी म्हटले. तर, दुसरीकडे राजधानी दिल्लीत वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी आणि चर्चा सुरू असल्याचे दिसून येते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांची दिल्लीत बैठक झाली, संसदेच्या परिसरात दोन्ही नेत्यांची ही भेट झाली असून ३५ मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. संसदेत दुपारी दोघांनीही एकत्र लंच केले, त्यामुळे विलीनीकरणाची लंच डिप्लोमसी होती की काय, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासंदर्भातील चर्चांना या घडामोडींमुळे वेग आल्याचं दिसून येत आहे. विलीनीकरणाबाबत मंत्री छगन भुजबळ यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात आपल्याच उपस्थितीत ४० ते ४५ मिनिटं विलीनीकरणावर चर्चा झाली होती असा दावा भुजबळांनी केला. छगन भुजबळ यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्यानंतर ते आजारी असताना जयंत पाटील आणि अजित पवार त्यांची विचारपूस करण्यासाठी आले होते. त्या भेटीदरम्यान भुजबळ यांनी स्वतः पुढाकार घेत अजित पवार चांगले नेतृत्व करत असून सर्वांनी पुन्हा एकत्र यायला हवे, अशी भूमिका मांडली.



एसटीच्या कंत्राटी भरती प्रक्रियेत पारदर्शकता राखा

बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून पैसे उकळणाऱ्या खासगी संस्थांची सखोल चौकशी करण्याचे परिवहन मंत्र्यांचे निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) लवकरच सुमारे १३ हजार ९८० चालक व यांत्रिकी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात येणार आहे. ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष आणि निर्धारित नियमांनुसार पार पडावी. बाह्य संस्थेमार्फत होणारी उमेदवारांची निवड महामंडळाने निश्चित केलेल्या पात्रता निकषांनुसारच करण्यात यावी. तसेच, या प्रक्रियेत कोणत्याही उमेदवाराची फसवणूक होणार नाही, याची दक्षता एसटी प्रशासनाने घ्यावी, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

एसटी महामंडळाच्या नावाचा गैरवापर करून काही खासगी संस्था गरजू



उमेदवारांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा! : मंत्री प्रताप सरनाईक

व बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवत त्यांच्याकडून अवैधरित्या पैसे उकळत असल्याच्या तक्रारी प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. नोकरीच्या अपेक्षेने या संस्थांवर विश्वास ठेवणाऱ्या तरुणांची आर्थिक फसवणूक होत असून, अशा प्रकारांमुळे महामंडळाच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचत आहे. काही व्यक्तींच्या गैरकृत्यांमुळे एसटी महामंडळाची जनमानसातील विश्वासार्हता बाधित होणे ही गंभीर बाब असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर, एसटी महामंडळाच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर प्रकारांची महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागामार्फत सखोल चौकशी करण्यात यावी. उमेदवारांची फसवणूक करणाऱ्या खासगी संस्था तसेच त्यांच्याशी संबंधित व्यक्तींची ओळख पटवून दोषींविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

भरती प्रक्रियेच्या नावाखाली बेरोजगार तरुणांची आर्थिक लूट करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही. भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वासार्हता कायम राखण्याबरोबरच उमेदवारांच्या हिताचे संरक्षण करण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.

संपादकीय....

चक्रीवादळाचा धोका

राज्यात दुष्काळाची स्थिती मात्र ओडिशा राज्यात येलो अलर्ट. आग्नेय बंगालच्या उपसागरात १६ तारखेला चक्रीवादळ येण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ओडिशा राज्यात सगळ्या जिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन यंत्रणा अलर्ट ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सगळे मंत्री या स्थितीचा आढावा घेणार आहेत . हा जरी अंदाज किवा शक्यता असली तरी प्रशासन अलर्ट मोडवर आहे .१८ आणि १९ तारखेला केंद्रपाडा आणि जगतसिंगपूर या ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे . राज्यात सध्या दुष्काळी स्थिती आहे. अल निनोचा परिणाम पाहायला मिळाला. एकीकडे राज्यात दुष्काळाची स्थिती असताना दुसरीकडे मात्र भारतीय हवामान विभागाने चक्रीवादळ येण्याची शक्यता वर्तवली आहे. आग्नेय बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. कमी दाबाच क्षेत्र हे हळूहळू तीव्र होत जाईल. याचा परिणाम म्हणून चक्रीवादळात याच रूपांतर होण्याची शक्यता भारतीय हवाम ान विभागाने व्यक्त केली आहे. भारतीय हवामान विभागाने जी शक्यता वर्तवली आहे त्यानुसार हे चक्री वादळ तयार होण्याच कारण कमी दाबाचा पट्टा आहे. मध्य अंदमान समुद्र आणि निकोबार बेटाच्या वरती असलेल्या चक्राकार स्थितीचा हा परिणाम आहे. पहाटेच्या दरम्यान हे कमी दाबाचे क्षेत्र तयार झाल होत. जे कमी दाबाचा क्षेत्र तयार झाल आहे. ते हळूहळू वायव्य दिशेने सरकत पुढे जाईल. १५ नोव्हेंबर पर्यंत हे खोल कमी दाबाच्या क्षेत्र या बाजूने तयार होईल अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

विकासाचा लेखाजोखा : शेतमजुरांच्या मजुरीत नेमकी किती वाढ झाली?

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

डॉ. भारत कऱ्हाड

देशाच्या विकासाची चर्चा करताना महामार्ग, मोठे उद्योग, विमानतळ, परकीय गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न आणि शेअर बाजारातील तेजी यांचे आकडे प्रामुख्याने पुढे केले जातात. देशाने आर्थिक आणि तांत्रिक क्षेत्रात केलेली प्रगती निश्चितच महत्त्वाची आहे. मात्र या विकासाचा लाभ समाजातील सर्वसाम ान्य माणसाला किती मिळाला, याची तपासणी करणेही तितकेच आवश्यक आहे. विशेषतः शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांच्या मजुरीत गेल्या दहा वर्षांत किती वाढ झाली, हा प्रश्न विकासाच्या मूल्यमापनासाठी महत्त्वाचा ठरतो.

भारतीय रिझर्व्ह बँकेने ११ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या 'हँडबुक ऑफ स्टॅटिस्टिक्स ऑन इंडियन स्टेट्स २०२४-२५' या अहवालातील तक्ता क्रमांक ११३ मध्ये ग्रामीण भागातील पुरुष सामान्य कृषी मजुरांच्या सरा- सरी दैनिक मजुरीची आकडेवारी उप- लब्ध आहे. त्यानुसार २०१४-१५ मध्ये देशातील अशा मजुरांची सरासरी दैनिक मजुरी २२४ रुपये ६० पैसे होती. २०२४-२५ मध्ये ती वाढून ३९८ रुपये झाली. म्हणजेच दहा वर्षांत प्रतिदिन १७३ रुपये ४० पैशांची वाढ झाली. टक्केवारीत ही वाढ सुमारे ७७.२ टक्के आहे.

पहिल्या नजरेत ही वाढ सम ाधानकारक वाटू शकते. परंतु या वाढीकडे केवळ रुपयांच्या आकड्यांतून पाहणे योग्य ठरणार नाही. कारण याच दहा वर्षांत अन्नधान्य, खाद्यतेल, इंधन, औषधे, शिक्षण, आरोग्य आणि घरखर्च यांसारख्या जीवनावश्यक बाबींच्या



किमतीतही वाढ झाली आहे. त्यामुळे मजुरीत ७७.२ टक्के वाढ झाली म्हणजे शेतमजुरांच्या जीवनमानातही तेवढीच सुधारणा झाली, असे म्हणता येत नाही.

येथे नाममात्र मजुरी आणि वास्तविक उत्पन्न यांतील फरक समजून घेणे आवश्यक आहे. नाममात्र मजुरी म्हणजे प्रत्यक्ष मिळणारी रुपयांतील रक्कम, तर वास्तविक मजुरी म्हणजे महागाईचा परिणाम लक्षात घेतल्यानंतर त्या पैशातून मिळणारी क्रयशक्ती. मजुरी वाढली असली तरी जीवनावश्यक वस्तूंच्या किमती त्याच वेगाने किंवा त्याहून अधिक वाढल्या असतील, तर मजुरांच्या आर्थिक परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नसू शकते.

केंद्रीय अर्थसंकल्पासोबत सादर करण्यात आलेल्या आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ मध्येही यासंदर्भातील म हत्त्वाची माहिती आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत कृषी क्षेत्रातील पुरुष मजुरांच्या नाममात्र मजुरीत सरासरी ५.७ टक्के आणि महिलांच्या मजुरीत ७ टक्के वाढ झाली. मात्र महागाईचा परिणाम वजा केल्यानंतर वास्तविक मजुरीतील वाढ पुरुषांसाठी केवळ ०.६ टक्के आणि महिलांसाठी १.८ टक्के होती. ही आकडेवारी सहा महिन्यांच्या कालावधीची आहे; ती संपूर्ण दहा वर्षांची वाढ समजू नये. तरीही नाममात्र मजुरी आणि वास्तविक उत्पन्न यांतील अंतर समजण्यासाठी ती महत्त्वाची आहे.

शेतमजुरांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करताना आणखी एक महत्त्वा- चा मुद्दा म्हणजे वर्षभर उपलब्ध होण-ारा रोजगार. शेतीचे स्वरूप हंगामी असल्यामुळे पेरणी, खुरपणी, कापणी आणि मळणीच्या काळात काम मि ळते; परंतु इतर काळात अनेक मजुरांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे दैनिक मजुरी वाढली असली तरी वर्षभर पुरेसे काम मिळत नसेल, तर कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादित राहते. मजुरीचा दर आणि रोजगाराचे दिवस या दोन्ही बाबींचा एकत्रित विचार केला पाहिजे.

महिला शेतमजुरांच्या परिस्थितीकडेही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. शेतीच्या अनेक कामांमध्ये महिलांचा मोठा सहभाग असतो. पे- रणी, लावणी, खुरपणी आणि कापणी यांसारख्या कामांमध्ये त्यांचे श्रम म हत्त्वाचे असतात. मात्र अनेक ठिकाणी पुरुष आणि महिलांच्या मजुरीत फरक आढळतो. त्यामुळे महिला शेतमजुरांच्या उत्पन्नातील वाढ, कामाचे दिवस आणि आर्थिक सुरक्षितता यांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील आणखी एक समस्या म्हणजे शेतीचा वाढता उत्प- ादनखर्च. बियाणे, खते, कीटकनाशके, वीज, सिंचन आणि यंत्रसामग्री यांवरील खर्च वाढत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो आणि त्याचा अप्रत्यक्ष परिणाम शेतमजुरांच्या रोजग- ारावरही होऊ शकतो. ग्रामीण भागात शेतीपूरक उद्योग, अन्नप्रक्रिया, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांना चालना देऊन स्थानिक रोजगाराच्या संधी वाढविणे आवश्यक आहे.



सरकारने ग्रामीण रोजगारासाठी विविध योजना राबविल्या आहेत. म ात्र या योजनांतून प्रत्यक्ष किती दिवस रोजगार मिळतो, मजुरी वेळेवर मिळते का आणि ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नात किती भर पडते, याचे मूल्यमापन झाले पाहिजे. केवळ योजनांसाठी केलेली आर्थिक तरतूद म्हणजे रोजगारनिर्मिती नव्हे. त्याची अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष लाभ महत्त्वाचा आहे.

विकासाचे मूल्यमापन करताना केवळ देशाचे राष्ट्रीय उत्पन्न किती वाढले किंवा मोठ्या उद्योगांची उलाढाल किती झाली, एवढे पाहून चालणार नाही. ग्रामीण भागातील सामान्य मजुराला दोन वेळचे अन्न, मुलांचे शिक्षण, आरोग्यसेवा आणि निवास या मूलभूत गरजा सहज भागविता येतात का, हेही तपासले पाहिजे. सरकारने कृषी मजुरांची राज्यनिहाय, स्त्री-पुरुषनिहाय मजुरी, रोजगाराचे दिवस आणि महागाईनुसार वास्तविक उत्पन्न यांची नियमित व पारदर्शक आकडेवारी उपलब्ध करून द्यावी.

गेल्या दहा वर्षांत देशातील पुरुष सामान्य कृषी मजुरांची सरासरी दैनिक मजुरी २२४ रुपये ६० पैशांवरून ३९८ रुपयांपर्यंत पोहोचली, ही वस्तुस्थिती आहे. परंतु या वाढीमुळे त्यांच्या जीवनमानात किती सुधारणा झाली, याचे उत्तर केवळ या आकड्यांतून मिळत नाही. त्यासाठी महागाई, क्रयशक्ती, रोजगाराची उपलब्धता आणि कुटुंबाचा वाढता खर्च यांचा एकत्रित विचार करावा लागेल.

देशाच्या विकासाची खरी कसोटी केवळ मोठमोठे प्रकल्प किंवा वाढते राष्ट्रीय उत्पन्न नसून, शेतात राबणाऱ्या मजुराच्या हातात महिन्याच्या शेवटी किती पैसा शिल्लक राहतो आणि त्याच्या कुटुंबाला सन्मानाने जगता येते का, ही आहे. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पो- होचला तरच विकसित भारताचे स्वप्न अर्थपूर्ण ठरेल.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

बहिणीविना भाऊबीज... आठवणींच्या ओंजळीत आजही जिवंत आहे माझी त्रिवेणी!



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भाऊबीज हा सण म्हणजे भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचा, मायेचा आणि भावनिक नात्याचा उत्सव! मात्र काही नाती काळाच्या पडद्याआड गेली, तरी त्यांच्या आठवणी मनातून कधीच पुसल्या जात नाहीत.

आज भाऊबीजेच्या निमित्ताने मनात अनेक आठवणी दाटून येत आहेत. सहा वर्षांपूर्वी अपघाताच्या दुर्दैवी घटनेत माझी लाडकी बहीण त्रिवेणी हिचे दुःखद निधन झाले. त्या दिवसापासून माझ्या आयुष्यातील भाऊबीजेचा आनंद जणू हरवून गेला. बहिणीच्या हाताने कपाळावर लागणारे कुंकवाचे टिळे, औक्षण, प्रेमाने दिलेला आशीर्वाद आणि तिच्या चेहऱ्यावरील आनंद आजही डोळ्यांसमोर उभा राहतो. पण आज ती नाही, ही जाणीव मनाला अस्वस्थ करते.

त्रिवेणीच्या पश्चात तिचा एक मुलगा आणि एक मुलगी आहेत. मामा म्हणून त्यांच्या आयुष्यात आईची उणीव भरून काढता येणार नाही, याची जाणीव असली तरी त्यांना प्रेम, आधार आणि मायेची सावली देण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न करतो. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदातच मला माझ्या बहिणीचे प्रतिबिंब दिसते.

आज भाऊबीज साजरी होत आहे; मात्र बहिणीच्या अनुपस्थितीत हा सण साजरा करताना मनात आनंदापेक्षा आठवणींचे दुःख अधिक आहे. काही माणसे आपल्यातून निघून जातात, पण त्यांचे प्रेम आयुष्यभर सोबत राहते.

त्रिवेणी, तू आज आमच्यात नसलीस तरी तुझ्या आठवणी आम च्या प्रत्येक श्वासात जिवंत आहेत. तुझी उणीव कधीच भरून निघणार नाही!

शब्दांकन : प्रा. रवींद्र गुलाबराव चाटे
प्राचार्य, महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय, लाखनवाडा

कार्तिकी यात्रेत दर्शनरांगेतील घुसखोरीला प्रतिबंध

उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरा- तील दर्शनरांगेत होणारी घुसखोरी रोखण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी प्रतिबंधात्मक आद- ेश जारी केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (२) अन्वये हे आदेश पारित करण्यात आले आहेत.

कार्तिकी यात्रा सोहळा दि. १० ते २४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत होत असून, या काळात लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल होतात. दर्शनासाठी भाविकांना अनेक तास रांगेत उभे रा- हावे लागते. त्यामुळे दर्शनरांगेचे योग्य व्यवस्थापन आणि शिस्त राखणे आवश्यक आहे.

यात्रा कालावधीत काही व्यक्तींकडून दर्शनरांगेत घुसखोरी होत असल्याच्या घटना प्रसारमाध्यमांतून तसेच भाविकांच्या तक्रारींतून निदर्शनास आल्या आहेत. अशा प्रकारांमुळे रांगेत गोंधळ निर्माण होऊन चेंगराचेंगरी अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार, श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनरांगेत घुसखोरी करण्यास प्रतिबंध करण्यात आला असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. कार्तिकी यात्रेदरम्यान दर्शन व्यवस्था सुरळीत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध राहण्यासाठी भाविकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

'डीआरआय'कडून नवी दिल्लीत सिएरा लिओनवरून आलेल्या प्रवाशाकडून २२ किलो कोकेन जप्त

राजकीय प्रतिनिधी असल्याचे भासवून अंमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या परदेशी महिलेला अटक

नवी दिल्ली : आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करी टोळ्यांविरुद्धच्या एका मोठ्या कारवाईत महसूल गुप्तचर संचालनायाने, सिएरा लिओनवरून आलेल्या एका परदेशी महिलेला पकडले असून तिच्याकडून २२ किलो वजनाचे कोकेन जप्त केले आहे. आंतरराष्ट्रीय अवैध बाजारात या अंमली पदार्थांची किंमत अनेक कोटी रुपये असल्याचे मानले जात आहे. या कारवाईतून एक अत्यंत धूर्त आणि धाडसी पद्धत उघड झाली आहे, ज्यामध्ये विमानतळा- वरील सुरक्षा तपासणी टाळण्यासाठी बनावट राजकीय ओळखपत्रांचा वापर केला जात होता.

संबंधित महिला, आपण एक राजकीय कुरियर असल्याचा दावा करत होती. तिच्याकडे एक मोठी ब्रीफकेससदृश पेटी होती, ज्यावर डिप्लोमॅटिक मेल आणि अधिकृत परवानगीशिवाय उघडू नये, अशा आशयाचे मजकूर लिहिलेले होते. तपासणी टाळण्यासाठी तिने काही बनावट कागदपत्रेही सादर केली, ज्यामध्ये हा माल संयुक्त राष्ट्रांच्या एका राजकीय कुरियरचा असल्याचे नमूद केले होते.

प्राप्त गुप्त माहितीच्या आध- ारे, डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी नियमांनुसार त्या ब्रीफकेसची कसून तपासणी केली. या तपासणीदरम्यान, प्लास्टिकच्या अनेक थरांमध्ये लपवून ठेवलेली २२ पाकिटे सापडली. या पाकिटांमध्ये पांढऱ्या रंगाचे, विटेच्या आकाराचे पदार्थ होते; प्राथमिक चाचणीत हे पदार्थ कोकेन असल्याचे निष्पन्न झाले.

कोकेनची ही २२ पाकिटे नार्को टिक ड्रग्ज अँड सायकोट्रोपिक सबस्टन्सेस क्ट, १९८५ अंतर्गत जप्त करण्यात आली आहेत. संबंधित महिलेलाही याच कायद्यान्वये अटक करून सक्षम न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

अंमली पदार्थांच्या तस्करीचे नवीन मार्ग शोधून काढणे, गुप्त माहितीच्या आधारे कठोर अंमलबजावणी करणे आणि संस्थात्मक विशेषाधिकारांचा गैरवापर करून अवैध व्यापार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळ्यांचा पर्दाफाश करण्यासाठी डीआरआय पूर्णपणे कटिबद्ध आहे.

प्रदेशाध्यक्ष राजेंद्रदादा पातोडे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

'बाळासाहेब आंबेडकर, आदेश दो हम संघर्ष करने को तैयार है!' हा नवा संकल्प मांडला

२५ नोव्हेंबरच्या 'संविधान सन्मान महासभे'च्या प्रचारासाठी ठाणे, नवी मुंबई व पालघर जिल्ह्यांचा संयुक्त मेळावा उत्साहात संपन्न!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी : बाळासाहेब अहिरे

ठाणे : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २५ नोव्हेंबर २०२६ रोजी मुंबईतील छत्रपती शिव- ाजी पार्क, दादर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या 'संविधान सन्म ान महासभे'च्या प्रचारासाठी तसेच संघटनात्मक बांधणीचा आढावा घेण्यासाठी ठाणे, नवी मुंबई आणि पालघर जिल्ह्यांचा संयुक्त मेळावा शुक्रवार, १३ नोव्हेंबर रोजी ठाणे पश्चिम येथील हंसा बँक्वेट्स येथे पार पडला.

वंचित बहुजन आघाडीचे म हाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. राजेंद्रदादा पातोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला ठाणे, कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ, बदला- पूर, मुरबाड, शहापूर, नवी मुंबई, पनवेल, मीरा-भाईंदर तसेच पालघर जिल्ह्यातील विविध शहरांमधील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


या बैठकीला ठाणे जिल्हा निरीक्षक तथा राज्य कमिटी पदाधिकारी अरुण जाधव, पालघर जिल्हा निरीक्षक उत्तम वनशिव, नांदेड जिल्हा निरीक्षक सारंग थोरात आणि धुळे-नंदुरबार जिल्हा निरीक्षक दीपक डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीमध्ये ठाणे जिल्ह्या- तील विविध शहरांचे अध्यक्ष, महिला आघाडी, युवा आघाडी तसेच विविध संघटनात्मक पदाधिकाऱ्यांकडून पक्षाच्या संघटनात्मक कामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. आगामी संविधान सन्मान महासभेच्या प्रचाराचे नियोजन, कार्यकर्त्यांची जबाबदारी, शहरनिहाय संपर्क आणि संघटनात्मक बांधणी याबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष राजेंद्रदादा पातोडे यांनी कार्यकर्त्यांसमोर एक नवीन संकल्पना मांडली. यापुढे कोणत्याही मोर्चा, आंदोलन अथवा जनआंदोलनाच्या वेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी एकजुटीने संघर्षासाठी सज्ज राहावे, या भावनेतून 'बाळासाहेब आंबेडकर, आदेश दो हम संघर्ष करने को तैयार है!' हा नवा नारा त्यांनी दिला.

यावेळी संविधानाचे महत्त्व, संविधानिक मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. २५ नोव्हेंबर रोजी होण- ारी संविधान सन्मान महासभा यशस्वी करण्यासाठी ठाणे, नवी मुंबई आणि पालघर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, महिला आघाडी, युवा आघाडी आणि कार्यकर्त्यांनी समन्वयाने प्रचारकार्य करण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष राजेंद्रदादा पातोडे यांनी केले.

संयुक्त मेळाव्याच्या माध्यम ातून आगामी संविधान सन्मान म हासभेच्या प्रचाराला गती देण्यासह विविध शहरांतील संघटनात्मक कामाचा आढावा घेण्यात आला.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

समृद्धी महामार्गावर भीषण अपघातांची मालिका! सिमेंट मिक्सर ट्रक पलटी; अपघात पाहण्यासाठी थांबलेल्या २५ हून अधिक कार एकमेकांवर आदळल्या

सुदैवाने जीवितहानी टळली; अनेक वाहनांचे मोठे नुकसान, अपघातस्थळी वाहतुकीचा खोळंबा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दैनिक यश सिद्धि न्युज नेटवर्क

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका घडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हिवरखेड पूर्णा ते तढेगाव दरम्यान चॅनल क्रमांक ३२१.९०० वरील पुलावर सिमेंट मिक्सिंग ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक बॅरिगेट्सला धडकून पलटी झाला. या अपघातानंतर घटनास्थळी निर्माण झालेल्या गोंधळात मागून येणाऱ्या वाहनांची एकमेकांना धडक बसली. विशेष म्हणजे, अपघात पाहण्यासाठी थांबलेल्या कारच्या रांगेला मागून आलेल्या एका भरधाव ट्रकने जोरदार धडक दिल्याने तब्बल २५ हून अधिक कारचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. सुदैवाने या घटनांमध्ये कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.



प्राप्त माहितीनुसार, इमरान अन्सारी मिराज अन्सारी (वय २४, रा. पनवेल) हा चालक अमरावती येथून मुंबईच्या दिशेने सिमेंट मिक्सिंग ट्रक घेऊन जात होता. शुक्रवारी सकाळी सुमारे ६.३० वाजेच्या सुमारास हिवरखेड पूर्णा ते तढेगावदरम्यान समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक ३२१.९०० वरील पुलावर अचानक ट्रकवरील त्याचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक महामार्गाच्या बाजूला असलेल्या बॅरिगेट्सला जोरदार धडक देऊन रस्त्यावर पलटी झाला. या घटनेने महामार्गावरील वाहतुकीत एकच खळबळ उडाली.

अपघात पाहण्याच्या उत्सुकतेत कारच्या लांबच लांब रांगा!

सिमेंट मिक्सिंग ट्रक पलटी झाल्यानंतर त्याच मार्गाने मागून येणाऱ्या काही कारची ट्रकला धडक बसली. सोनोशी येथील गजानन नागरे हे पुणे येथे जात असतांना, गाडी थांबवून ट्रकचालकास बाहेर काढले. ट्रकमधील सिमेंट अपघातामुळे सर्वत्र विखुरले गेल्याने रस्त्यावर दिसणे अंधुक झाले होते. याचवेळी रहदारीला अडथळा होऊ नये म्हणून, अपघातग्रस्त ट्रक बाजूला काढण्यासाठी मागून येणारी वाहने थांबविली गेली. तसेच हा अपघात पाहून नेमके काय घडले, अपघातग्रस्तांना मदतीची गरज आहे का, याची माहिती घेण्यासाठी तसेच उत्सुकतेपोटी अनेक कारचालकांनी आपली वाहने थांबवली. परिणामी अपघातस्थळाच्या परिसरात कारच्या रांगा लागल्या. मात्र, हीच बाब पुढील मोठ्या अपघाताला कारणीभूत ठरली.

कारची रांग लागलेली असतानाच मागून वेगाने येणाऱ्या एका ट्रकने रांगेतील कारना जोरदार धडक दिली आणि धडक दिल्यानंतर तो ट्रक घटनास्थळावरून पसार झाला. या धडकेमुळे रांगेतील उभ्या असलेल्या कार एकापाठोपाठ एक पुढील वाहनांवर आदळल्या. त्यामुळे अनेक कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात नुकसान झालेल्या कारची संख्या २५ पेक्षाही अधिक असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

काही कारचालक निघून गेल्याने वाहनांची नेमकी संख्या अस्पष्ट!

या घटनाक्रमात काही कारचे मोठे नुकसान झाले, तर काही वाहनांना किरकोळ खरचटले. किरकोळ नुकसान झालेल्या काही कारचालकांनी घटनास्थळावरून पुढील प्रवास सुरू केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे या साखळी अपघातात नेमक्या किती कारचे नुकसान झाले, याची निश्चित संख्या समोर येणे कठीण झाले आहे. प्रत्यक्ष नुकसानीचा आकडा संबंधित यंत्रणांच्या पाहणीनंतरच स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

पोलीस व आरोग्य विभागाची घटनास्थळी धाव; गंभीर दुखापत नाही!

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातातील किरकोळ जखमींना वैद्यकीय उपचार देण्यास सुरुवात करण्यात आली. सुदैवाने या संपूर्ण घटनाक्रमात कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याची माहिती आहे.

दरम्यान, अपघातग्रस्त ट्रक आणि कार महामार्गाच्या बाजूला हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांनी खबरदारी घेत एका बाजूने वाहतूक सुरू ठेवली.

अपघात पाहण्यासाठी वाहन थांबविणे ठरू शकते जीवघेणे!

समृद्धी महामार्गावर घडलेल्या या घटनाक्रमातून एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर एखादा अपघात घडल्यास केवळ उत्सुकतेपोटी आपले वाहन रस्त्यावर थांबवून अपघात पाहणे किती धोकादायक ठरू शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. मदतीची भावना महत्त्वाची असली, तरी त्यासाठी वाहतुकीला अडथळा निर्माण न करता सुरक्षित अंतर राखणे आणि आपत्कालीन यंत्रणांना सहकार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा एका अपघातातून अनेक वाहनांच्या अपघातांची साखळी निर्माण होऊन निष्पाप प्रवाशांचे जीव धोक्यात येऊ शकतात.

कार्तिकी यात्रेत अन्नभेसळ रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे दाखल होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाने प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. पंढरपूर शहर व परिसरातील दूध व दुग्धजन्य पदार्थ, बेकरी पदार्थ तसेच हॉटेलमधील खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

दूध, दुग्धजन्य पदार्थ, बेकरी व हॉटेलमधील खाद्यपदार्थांवर प्रशासनाची नजर

कार्तिकी यात्रा सोहळा १० ते २४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत होत आहे. या काळात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी आणि चंद्रभागा स्नानासाठी लाखो भाविक पंढरपुरात येतात. कार्तिकी एकादशीपासून गोपाळकाल्यापर्यंत वारकरी शहरात वास्तव्यास असल्याने त्यांच्या भोजनामध्ये दूध, बासुंदी, खीर यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. दूध व दुग्धजन्य पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता असते. त्यात भेसळ झाल्यास भाविकांना विषबाधा होऊन त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याने प्रशासनाने यंदा विशेष खबरदारी घेतली आहे. वारकऱ्यांना सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी दूध, दुग्धजन्य पदार्थ व खिचडी आदी खाद्यपदार्थांचे नमुने तपासण्यात येणार आहेत.

या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून पंढरपूर शहर व परिसरात अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणे तसेच विषबाधा होण्यास कारणीभूत ठरेल अशी परिस्थिती निर्माण करण्यास प्रतिबंध करणारे आदेश जारी केले आहेत.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांची दुधनीत रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या घरी सांत्वनपर भेट



दुधनी/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांचे वडील कालटथीत.शिवयोगी झळकी यांचे दि. ०२/११/२०२६ रोजी निधन झाले. तालुक्याचे आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी भीमनगर, दुधनी ग्रामीण येथील घरी सांत्वनपर भेट दिली. प्रारंभी कै. शिवयोगी झळकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, प्रतिष्ठीत व्यापारी रामचंद्र बिराजदार, मा. नगरसेवक गोपीचंद मेळकुंदे, महेश पाटील, प्रगतीशील शेतकरी शंकर भांजे, हणमंत कलशेट्टी, दुधनी ग्रामीणचे युव नेतृत्व अशोक राठोड, दुधनी रिपाइं शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी, महेदिमिंया जिडगे, मडु अंदेनी,पिंटू (शांतु) लोड्डे, पांडूरंग बनसोडे, गुरु धोडमनी, संतोष जन्ना, धोंडु सर,गुरुबाळ(मोदी) परम शेट्टी,युन्नूस शेख, शिवा राठोड,गौतम झळकी, लक्ष्मिपुत्र रेऊर, सिध्दु यातगीर,कोतली सर,पोमु राठोड सर, हौशेट्टी सर, तिप्पण्णा मानकर,राहुल झळकी, सचिन लोड्डे,जयभीम बळूंडगी, अर्जून पुजारी,व इतर ग्राम स्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग १२ मधील काँक्रिटीकरण रस्त्याचे लोकार्पण उत्साहात संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्रमांक १२ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत श्री छत्रपती संभाजी नगर रोड ते श्री. साहेबराव जाधव यांच्या घरापर्यंत करण्यात आलेल्या काँक्रिटीकरण रस्त्याचा लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी उत्साहात संपन्न झाला.

या रस्त्याचे लोकार्पण आमदार मा. श्री. दिलीप काका बनकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विधान परिषद आमदार मा. श्री. गोकुळभाऊ गीते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष श्री. राजाभाऊ शेलार, उपनगराध्यक्ष श्री. अनिल पाटील कुंदे, विमलताई जाधव, श्री. गणेशभाऊ बनकर, शिवाजी दादा ढेपले, नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री. सचिन ढिकले, मधुकर शेलार, सागर पाटील कुंदे, सुभाष अण्णा कराड, नंदू पाटील कापसे, साहेबराव जाधव, अमोल भालेराव, भाऊसाहेब कापसे, सुनील अशोक कापसे, दीपक गाजरे, प्रवीण गोळे, संदीप गाजरे, अशोक पगारे, स्वप्नील बिनायकिया, रतन पुंड, जयवंत कापसे, रावसाहेब माळोदे, बाळासाहेब शेळके, स्वप्नील गोळे, देवा गांगुर्डे, अनिल पाटील, नामदेव जाधव, प्रकाश निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांची वाहतूक अधिक सुलभ होणार असून प्रभागातील पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण भर पडणार आहे. या विकासकामासाठी मा. नगराध्यक्ष तथा नगरसेविका श्रीमती रत्नमाला संपतराव कापसे आणि मा. नगरसेवक देवदत्त संपतराव कापसे यांनी विशेष प्रयत्न केले.

यावेळी परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोंडगावदेवी येथील प्रबोधनात्मक उद्घाटन साजरा

प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन

धर्माच्या व्याधीने तळपणाऱ्या लोकशाहीला संविधानाची गरज आहे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/अर्जुनीमोरगाव :



या देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान देऊन संपूर्ण मानव घटकांना खरे स्वातंत्र्य केले. पण देश चालविणारे धर्म आळ आणून ह्या लोकशाहीला वेदना प्रस्ताव. हे फार मोठे दु:ख दिसून येते. भारतीय समाजाला धर्माने ग्रहण लावले आहे. म्हणून धर्माच्या व्याधीने तळपणा-या लोकशाहीला संविधानाची खरी गरज आहे. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे व संविधानाचे अभ्यासक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर नामदेवजी हरणे भुमि अभिलेख लाखांदूर यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटक म्हणून कमलेश हुमणे नागपूर, इंजि. हेमंतजी हुमणे, प्रकाश मेश्राम, श्रीमती अंजीराबाई उके सामाजिक कार्यकर्त्या बोडगांव, मनिष एन. रामटेके पुणे, हेमंतकुमार लाडे,

प्रभाकर दहिकर सा. कार्यकर्ता येरंडी, पुनाराम जगझापे, एस. एस. खोब्रागडे, बाबुदानजी मेश्राम, रोहितजी ढवळे, एच एस पात्रीकर, मंगलाताई रामटेके पो.पा., भाग्यवान फुल्लुके, रापेश्यामजी झोळे, अभयजी फुत्तुके, प्रतिमाताई बोरकर, स्नेहा नरेंद्र बालवे गोरेगांव, उमेश बोरकर मुख्याध्यापक, आकाशजी मेश्राम, आनंदजी बोरकर, कुकसू मेश्राम, शुभमजी गभणे आदी मान्यवर उपस्थित होते.

तालुक्यातील बोंडगावदेवी येथे मंडई निमित्य कव्वाली प्रबोधनात्मक कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती यांनी आयोजित केला होता. प्रसंगी भगवान बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पाहुण्यांचे सन्मान करुन सत्कारमुर्तींचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. मार्गदर्शन करताना प्रा. नंदागवळी म्हणाले- धर्म अफूची गोळी आहे. या गोळीने सामाजिक आरोग्य सुधारत नाही. तर ग्रासून अजून पोखरत जाते. म्हणून लोकशाहीला ही व्याधी खिळखिळी करत असते. यावर जालीम उपाय हे संविधान आहे. संविधानच मानव समाजशील प्राणीमात्रांचे भवितव्य उंचावू शकते. असे मार्मिक चिंतन व्यक्त करीत मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन अध्यक्ष विरेंद्र नंदागवळी यांनी केले तर आभार आकाश ठवरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समिती सचिव शांतीप्रकाश भैसारे, सौ. रामटेके, सौ. बोरकर, सौ. हुमणे यांनी मोलाचे सहकार्य केले.

नपा, मनपा शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी अशोक शेंडगे यांची नियुक्ती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य नपा मनपा शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३, तुळजापूर येथील सहशिक्षक अशोक शेंडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राज्य अध्यक्ष अर्जुन कोळी यांनी त्यांच्या निवडीची घोषणा केली आहे.

लातूर विभागातील नगरपरिषद आणि म हानगरपालिका शिक्षकांच्या वेतन, चटोपाध्याय वेतनश्रेणी, निवड श्रेणी, सेवानिवृत्त वेतन आणि इतर समस्या सोडविण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडल्याबद्दल त्यांची या पदावर निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल संघटनेचे राज्याध्यक्ष श्री. अर्जुन कोळी, राज्य सरचिटणीस श्री. अरुण पवार, कार्याध्यक्ष श्री. सुभाषराव कोल्हे, उपाध्यक्ष राजीव भिरड, ज्योत्स्ना भरडा, महिला आघाडी प्रमुख साधनाताई साळुंखे, जुनी पेन्शन अध्यक्ष श्री. सुनील खरात, जुनी पेन्शन उपाध्यक्षा आशा घुले, राज्य सरचिटणीस श्री. धोंडीराम चपडे, राज्य पदाधिकारी जयंत इंदापूरकर, रेजा पायाळ, योगिता कापसे, वैभव पाटील, माया कांबळे, महादेवी चिकाटे, सुरेश गायकवाड, मधुकर खिल्लारे, श्याम कोळी, सतिश यादव यांच्यासह राज्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

अशोक शेंडगे यांनी नगरपरिषद शाळा क्रमांक ३, तुळजापूरची शाळा छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्तेत उत्कृष्ट शाळा, मराठवाड्यातील पहिली आय .एस.ओ. शाळा म्हणून नावारूपास आणली आहे. शिष्यवृत्ती, नवोदय स्पर्धा परीक्षेचे अध्यापन करणे, शाळेला सी.आर.एस. फंडातून ९५ लाख रुपयांपर्यंतचा निधी मिळवून दिला आहे. अशा शैक्षणिक कामामुळे संघटनेने त्यांच्यावर मोठी जबाबदारी दिलेली आहे.

दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी अकोला येथील महाराष्ट्र राज्य नपा मनपा शिक्षक संघटनेच्या वतीने शेकडो शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यात अशोक शेंडगे यांना राज्य उपाध्यक्ष पदाच्या निवडीचे पत्र देण्यात येणार आहे. या भव्य आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राज्यभरातील सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाला येण्याचे आवाहन नूतन राज्य उपाध्यक्ष अशोक शेंडगे यांनी केले आहे.

कार्तिकी यात्रेसाठी पंढरपुरातील अतिक्रमणे हटवून स्वच्छतेला प्राधान्य द्या

कार्तिकी यात्रा नियोजनासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे; जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे निर्देश; यात्राकाळात १२ ते १३ लाख भाविक येण्याची शक्यता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : कार्तिकी शुद्ध एकादशी शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी असून, कार्तिकी यात्रा कालावधी १० ते २४ नोव्हेंबर असा आहे. या कालावधीत सुमारे १२ ते १३ लाख भाविक पंढरपुरात येण्याची शक्यता आहे. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी शहरातील सर्व अतिक्रमणे हटविण्यासाठी अतिरिक्त पथके नियुक्त करावीत. तसेच चंद्रभागा वाळवंट, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरासह संपूर्ण शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

कार्तिकी यात्रा नियोजनाच्या अनुषंगाने श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी सिताराम डुबल, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पंकज कुंभार, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यात्रा कालावधीत भाविकांना मुबलक व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह शहरातील स्वच्छतेची योग्य व्यवस्था करावी. अनधिकृत होर्डिंग तातडीने हटवावेत. वाहनतळांच्या ठिकाणी म ुमीकरण करून पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी. सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या स्वच्छतेसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत. भक्तिसागर येथे वारकरी व भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी



नगरपालिका प्रशासनाला दिल्या.

मंदिर समितीने दर्शनरांगेतील बॅरिकेडिंग सुस्थितीत ठेवावे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी जर्मन हँगर उभारून त्यामध्ये पिण्याचे पाणी, भोजन, सुलभ शौचालये आणि मॅटची व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने पुरेसा औषधसाठा उपलब्ध ठेवून अतिरिक्त खाटांची व्यवस्था करावी, तसेच आरोग्यदूतांची नियुक्ती करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. वाखरी येथे यात्राकाळात मोठ्या प्रमाणात जनावरांचा बाजार भरत असल्याने पशुवैद्यकीय विभागाने स्वतंत्र पथक नियुक्त करून जनावरांचे लसीकरण, औषधोपचार तसेच जनावरे आणि पशुपालकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, असेही त्यांनी सांगितले.

चौपाळा ते शिवाजी चौक या दरम्यान रिक्षांची गर्दी होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने आवश्यक कारवाई करावी. अन्न व औषध प्रशासनाने स्वतंत्र पथके नियुक्त करून शहरातील तसेच परिसरातील खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि दूध विक्री केंद्रांची तपासणी करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी. सरगम चौकातील राष्ट्रीय महामार्गाचे सुरू असलेले काम वाहतुकीस अडथळा ठरणार नाही, यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. महावितरणने अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा करावा. भाविकांसाठी उपलब्ध असलेल्या गॅस वितरण केंद्रांवर अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवावी. राज्य परिवहन विभागाने बसस्थानकात शुद्ध पिण्याचे पाणी व नियमित स्वच्छतेची व्यवस्था करावी, तसेच दगडी पुलावर तात्पुरते बॅरिकेडिंग करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांग व दर्शनमंडप येथे भाविकांसाठी करण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी नगरपरिषदेमार्फत करण्यात येणाऱ्या व्यवस्थेची माहिती सादर केली.

बैठकीत पाटबंधारे विभाग, राज्य परिवहन विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. कार्तिकी यात्रा सुरळीत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी यावेळी दिले.

किल्ले स्पर्धेतून शिवरायांचा इतिहास जिवंत; मनसे कडून बालगोपाळांची कौतुक



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर

दिवाळी आणि मुलगी बाळ गोपाळ यांनी केलेल्या किल्ल्यांची स्पर्धा व त्यांचे कौतुक करणे, शहरातील तरुण मित्रज्ञ, बंधू बहिणी व वडीलधारी मंडळी हे दिवाळीनिमित्त शिवाजी महाराजांच्या वेगवेगळ्या किल्ल्यांचे देखावे करत असतात त्याचबरोबर किल्ल्याची बांधणी ही करत असतात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मनसेच्या वतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी शहरातील विविध भागात त किल्ल्यांना भेटी देऊन किल्ले बनवणाऱ्या सर्व तरुण-तरुणींना वडीलधारी मंडळी व बालगोपाळांना प्रोत्साहित करण्यात आले. यावेळी किल्ले बनवलेल्या स्पर्धकाशी संवाद साधत त्यांनी केलेल्या भिंतीचे फोटो करण्यात आले. शिवरायांचा गड किल्ल्यांचा इतिहास नव्या पिढी पर्यंत पोचवण्याची ही स्पर्धा महत्वाची ठरत असून दिवाळी ही आनंदाच्या धुमधडाक्यात साजरी करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांची मागणी : लागवडीसाठी पर्यायी व्यवस्था करुन द्या

रब्बी पिकांसाठी शेतकऱ्यांना तातडीने पीक कर्ज द्या



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुन्नाभाई नंदागवळी/गोंदिया : अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेंतर्गत कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांची बँकांकडे पीक कर्जासाठी प्रतीक्षा सुरू आहे. तरी सुद्धा शेतकऱ्यांना उन्हाळी हंगामातील पिकांची लागवड करण्यासाठी आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. तेव्हा परिसरातील शेतकरी बांधवांना रब्बी हंगामासाठी पिक कर्ज तातडीने देण्यात यावा. अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

मागील अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले आहे, अशा अनेक शेतकऱ्यांना अद्याप नवीन पीक कर्ज मिळालेले नसल्याची बाब समोर येत आहे.

कर्जमाफी होऊनही नवीन पीक कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर उन्हाळी पिकांच्या लागवडीचा प्रश्न निर्माण झाला आहे. बियाणे, खते, औषधे, मजुरी तसेच शेतीच्या इतर खर्चासाठी शेतकऱ्यांना पैशांची आवश्यकता आहे. वेळेवर कर्ज उपलब्ध न झाल्यास उन्हाळी पिकांच्या लागवडीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

शासनाने कर्जमाफी केलेल्या शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफीपुरते मर्यादित न ठेवता त्यांना पुन्हा शेतीसाठी आर्थिक आधार देणे गरजेचे आहे. संबंधित बँका व सहकारी संस्थांनी कर्जमाफी झालेल्या पात्र शेतकऱ्यांची प्रकरणे तातडीने तपासून त्यांना उन्हाळी हंगामासाठी नवीन पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. तसेच शासन व संबंधित कृषी आणि सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन पात्र शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज मिळेल यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे.

शेतकऱ्यांना वेळेवर पीक कर्ज मिळाले, तरच उन्हाळी हंगामातील शेतीची कामे सुरळीतपणे करता येतील. त्यामुळे शासनाने आणि बँक प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय द्या.

– किशोर येरणे, शेतकरी बाराभाटी

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या शेतकरी सभासदांना मोठा दिलासा!

१६ जानेवारीपासून प्रति टन ३५००/रुपयांचा पहिला हप्ता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

प्रतिनिधी/पंढरपूर : विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या शेतकरी सभासदांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. कारखान्याची चेअरमन तथा आमदार अभिजीत आबा पाटील ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय जाहीर केला आहे.

ऊस दर दोन वाढवून जानेवारीपासून प्रति टन सुमारे ३५०० रुपये पहिला हप्ता देण्यात येणार आहे. शेतकरी सभासदांना भाव वाढवून देण्याचा कारखाने संचालक मंडळ प्रयत्नशील असल्याची चेअरमन यांनी सांगितले आहे. ऊस दराबाबत टप्प्याटप्प्याने वाढ करण्याचा निर्णय शेतकरी सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे. कारखान्याची शेतकऱ्यांची सभासदांची नाते अधिक दृढ व्हावे आणि शेतकऱ्यांचा विश्वास कायम राहावा. यासाठी कारखाना प्रशासन प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सायली साठे यांच्या पहाट गाण्यांनी हेरिटेज मनिधारी मधील श्रोते मंत्रमुग्ध ; पत्रकार दशरथ वडतिले यांनी सादर केला वासुदेव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर: सोलापूरच्या अक्कलकोट रोडवरील हेरिटेज मनिधारी एम्पायर सोसायटीत भाऊबीजेनिमित्त महागायिका सायली साठे व सहकाऱ्यांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक वरचढ भावभक्ती गीतांनी व अभंगानी श्रोते मंत्रमुग्ध झाले. संगीताने न्हाऊन निघाले.त्यात ज्येष्ठ पत्रकार श्री.दशरथ वडतिले यांनी वासुदेव आला हो वासुदेव आला या गाण्यावर खास वेशभूषेत नृत्य सादर करून लोकांची मने जिंकली.त्यांच्या अभिनयाने सारे श्रोते थक्क झाले.

हेरिटेज मनिधारी सांस्कृतिक मंडळाच्यावतीने यंदा पहिल्यांदाच केलेला हा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी



झाला. सोसायटीतली मोठ्या बागेतील हिरवळीवर गाण्यांचा हा बहारदार कार्यक्रम पार पडला.हिरवाईने नटलेल्या कार्यक्रमस्थळी उत्तम सजावट करण्यात आली होती.गुलाब पाकळ्यांवर पणत्यांची आरास केली होती.गुलाबी थंडीत दीप प्रज्वलित कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रारंभी महागायिका सायली साठे यांनी,सुंदर माझे जाते ग ही ओवी खास ढंगात सादर केली तर प्रसिद्ध गायक श्री.निखिल भालेराव यांनी म्हटलेल्या माऊली माऊली या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.सर्व गायकांनी अफलातून गायन केल्याने श्रोत्यांनी त्यांच्यावर अक्षरशः बक्षिसांचा वर्षाव केला.सारे वातावरण भक्तीमय झाले होते.

तीन तास चाललेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले यांनी खास ढंगात व खुमासदार शैलीत केले. सोसायटीचे चेअरमन अंजली माशाळकर यांनी सायली साठे यांचा तर मंडळाचे अध्यक्ष श्री.श्रद्धानंद नरोणे यांनी निखिल भालेराव यांचा शाल व नॅपकिन बुके देऊन सत्कार केला.याप्रसंगी सोसायटीचे संचालक व उद्योजक श्री.अविनाश कटारे यांनी आपल्या भाषणात सर्व कलाकारांचे कौतुक केले.सायली साठे यांनी मनोगत व्यक्त करुन समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास सोसायटीचे पदाधिकारी,संचालक,तसेच सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी व सोसायटीतील नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात सायली साठे, निखिल भालेराव,राजगंधर्व सदाफुले व वैभव हलसंगे यांनी बहारदार गीते सादर केली. करण भोसले यांनी ढोलकी व तबल्याची साथ दिली तर आमिर हुंडेकरी व सोनू हुंडेकरी या बंधूंनी संगीत संयोजन केले. या कार्यक्रमात गायकांनी मराठी,हिंदी,कन्नड व तेलुनू गीते सादर केली.

पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते उद्घाटन

प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांच्या पुढाकारातून आयोजन!

पत्रकारांच्या हक्कांसाठी लोकशाही पत्रकार महासंघाचा भव्य राज्यस्तरीय मेळावा परभणीत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पत्रकार प्रशिक्षण, राज्यस्तरीय सहविचार बैठक व पदाधिकारी नियुक्ती समारंभाचे आयोजन!

मुंबई । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार महासंघ, भारत यांच्या वतीने रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी परभणी येथे भव्य राज्यस्तरीय सहविचार बैठक, पत्रकार प्रशिक्षण मेळावा व पदाधिकारी नियुक्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून, महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. किशोर दादा पवार यांच्या पुढाकारातून या महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास परभणीचे खासदार संजय जाधव, जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि पोलीस अधीक्षक पंकज कुमावत (खझड) यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्रातील पत्रकार, संपादक आणि मीडिया प्रतिनिधींना सक्षम संघटनात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या विविध प्रश्नांना शासन-प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे आणि पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी राज्यभर संघटनात्मक ताकद उभी करणे, या दिशेने प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांचे विशेष प्रयत्न सुरू





आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली म हासंघाचे कार्य राज्यातील विविध जिल्हे, तालुके आणि शहरांपर्यंत अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म हासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. संतोषकुमार जयस्वाल, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय महामंत्री टी. माधव, सरचिटणीस हलिमाताई शेख, दैनिक लोकनेताचे मुख्य संपादक तथा राष्ट्रीय संघटनमंत्री ज्ञानेश्वर बुधवत, जालना महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका तथा दैनिक ज्योती बने ज्वालाच्या संपादिका आयेशा मुलानी, डिजिटल मीडिया अध्यक्ष मेहबूब शेख, राज्य संघटक रहीम खान आणि प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे.

या राज्यस्तरीय मेळाव्यात पत्रकारांचे हक्क, संरक्षण, सुरक्षा, सन्मान, पत्रकारितेतील नैतिक मूल्ये, डिजिटल माध्यमांची बदलती आव्हाने, शासकीय योजना, पत्रकार प्रशिक्षण आणि पत्रकारांच्या विविध समस्यांवर सविस्तर विचारमंथन होणार आहे. याच कार्यक्रमात महासंघाच्या विविध पदांवरील पदाधिकारी नियुक्ती समारंभ पार पडणार असून, आगामी संघटनात्मक वाटचालीची दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व संपादक, पत्रकार, मीडिया प्रतिनिधी तसेच राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व शहर स्तरावरील सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महत्त्वपूर्ण उपक्रमाला यशस्वी करावे, असे आवाहन प्रदेशाध्यक्ष किशोर दादा पवार यांनी केले आहे.

कार्यक्रमाचा तपशील :

– दिनांक : रविवार, १५ नोव्हेंबर २०२६

– वेळ : सकाळी ११:३० वाजता

– स्थळ : सावली शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस), परभणी

– मोबाईल क्रमांक: ९८३४००९६५७

पत्रकारांचा सन्मान, हक्कांचे संरक्षण आणि संघटनात्मक सक्षमीकरणासाठी चला, एकत्र येऊया!